माझेही मत!

# प्रकाशाचा मार्ग



**अंधाराकडून प्रकाशाच्या वाटेवर चालण्याचा निर्धार करणे, हा या दीपोत्सवाचा खरा अर्थ आहे. दिवाळीच्या दिवशी हा ज्ञानाचा दिवा खरोखरी लावता आला पाहिजे. एखादी पणती पेटवण्यासाठी आवश्यक असते ती वात, तेल आणि अग्नी. या तिन्हींच्या एकत्रीकरणाशिवाय प्रकाशाची निर्मिती होत नाही, परिणामत: अंध:काराचा नाश होत नाही.**

मानवी जीवनातील प्रकाशाचे महत्त्व आजच्या आधुनिक काळातही वादातीत आहे. आधुनिक विज्ञानाप्रमाणे दृश्यसृष्टीतील पदार्थांपैकी प्रकाशाची गती सर्वात जास्त आहे. प्रकाशवेगाच्या अलीकडील वेग असलेली वस्तू ही स्थूल विश्वात येते, तर प्रकाशवेगाच्याही पलीकडे वेग असलेली वस्तू ही सूक्ष्मातीत असते. उदा. मनाचा वेग प्रकाशवेगाच्याही पलीकडे आहे असे मानले जाते. कारण ज्या ध्रुवताऱ्याचा प्रकाश हा पृथ्वीवर काही वर्षांनी पोहोचतो, त्या ध्रुवताऱ्यावर मानवी मन हे काही क्षणात पोहोचते. म्हणूनच अध्यात्मशास्त्राप्रमाणे मानवी मनाची गणना सूक्ष्म सृष्टीत होते. त्याचप्रमाणे प्रकाशाच्या सहाय्याने वस्तू पाहता येते, परंतु प्रत्यक्ष प्रकाश मात्र विज्ञानाला अजून दिसलेला नाही. या सर्व कारणांमुळे अध्यात्मशास्त्राप्रमाणे प्रकाश हा व्यक्त आणि अव्यक्त सृष्टींच्या सीमारेषेवर आहे असे मानले जाते. बहुधा याचकरिता जवळजवळ सर्व धर्मांत प्रत्यक्ष अथवा धूम्ररूपातील प्रकाशाचा प्रार्थनेसमयी स्वीकार केलेला आढळतो. हिंदू संस्कृतीत तर वर्षातील सर्वात मोठा सण हा प्रकाशाच्या पूजेकरिताच योजला आहे. तो म्हणजे दीपावली.

दीपावली या सामाजिक शब्दाचा शब्दश: अर्थ म्हणजे दीपांची आवली म्हणजेच दिव्यांची रांग अथवा पंक्ती. प्रत्येक जण आपापल्या परंपरेनुसार गोडधोड करून घर सजवून दिवाळी साजरी करतो, परंतु फक्त उत्सव करणे हा दीपावलीचा उद्देश नाही. अथवा फक्त दिव्यांची आरास करून पूजा करणे एवढाच मर्यादित अर्थ दीपोत्सवाचा नाही.



जेथे प्रकाश असतो, तेथे अंधार राहत नाही, किंबहुना राहूच शकत नाही. म्हणूनच प्रकाशाची पूजा ही अंधार नष्ट करण्यासाठी असावी. आपण मानवी जीवनात जन्माला आलेलो आहोत. रोज नवनवीन सुख, दु:ख आपण भोगत असतो. हा आपल्या जीवनातील पहिला अंध:कार आहे. वस्तुत: असे सुख, दु:ख भोगणारा हा तो पंचमहाभूतात्मक देह असतो. त्यातील चैतन्य किंवा आत्मतत्त्व, ज्याला सर्वसामान्य भाषेत 'मी' म्हटले जाते, त्याला या सुखदु:खांचा स्पर्शही नसतो. तरीही भोगण्याची ही किमया मनाकडून घडते, ती केवळ 'कोऽहं' - मी कोण? या प्रश्नाच्या उत्तराच्या अज्ञानामुळे. स्वत:च्या स्वरूपाविषयीचे हे अज्ञान म्हणजेच खरा अंध:कार! या अंध:काराला नष्ट करणाऱ्या प्रकाशाची वाट आपल्याला माहीत नसल्याचे किंवा अशा प्रकाशाशी अनभिज्ञ असल्याचे स्वत:ला आपण भासवतो, हा आपल्या जीवनातील दुसरा अंध:कार होय.

दीपावलीनिमित्त दीपोत्सव साजरा करण्यामागील तत्त्व प्राचीन वैदिक वाङ्मयातील तीन ओळींत प्रतिबिंबित झाले आहे.

असतो मा सद्गमय,<br>
तमसो मा ज्योतिर्गमय,<br>
मृत्योर्मामृतं गमय।।<br>
- (बृहदारण्यकोपनिषद १/३/२८)

याचा अर्थ आम्हाला असत्कडून सत्कडे ने, अंधाराकडून प्रकाशाकडे ने आणि मृत्यूकडून मृत्यूविरहित अशा अमर अवस्थेकडे ने. येथे श्रुतीला अपेक्षित असलेला अंधार म्हणजे अज्ञानरूपी मृत्यू होय.

प्रकाशरूपाने प्रकाशाची केलेली पूजा म्हणजेच दीपोत्सव! प्रत्येकात अवस्थित असलेले चैतन्य हा आंतरप्रकाश आणि दिव्यांमधील प्रकाश हा बाह्यप्रकाश, हे ज्ञान मनात ठसवून दिवाळीच्या दिवशी ज्ञानाचा दिवा लावता आला पाहिजे. कित्येक वेळा पुस्तकी पांडित्य मिळवून 'मी ज्ञानाने परिपूर्ण झालो', अशी स्वत:ची समजूत करून घेऊन मनुष्य खऱ्या ज्ञानापासून दूरच राहतो. कारण अज्ञानाच्या या अंधाराचे हरण केवळ आत्मज्ञानरूपी 'सोऽहं', - तोच मी, या प्रकाशाने होते. मानवी जन्माचे खरे प्रयोजन काय, याचा जो विचार करतो त्याला काही ना काही मार्गाने ईश्वरीतत्त्वाकडून मार्गदर्शन निश्चितच मिळते.

त्या दृष्टिकोनातून आवश्यक ते प्रयत्न स्वत: अभ्यास करून तरी केले पाहिजेत किंवा ज्या ठिकाणी आपली श्रद्धा असेल, मग ती एखादी गुरूपदावरील व्यक्ती असो, देवप्रतिमेतील शक्ती असो वा सद्ग्रंथ असोत, त्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्यातील मार्गदर्शनाप्रमाणे प्रकाशाचा मार्ग चालण्यास सुरुवात केली पाहिजे. एखादा वैज्ञानिक प्रयोगशाळेत स्वत: प्रयोग करतो व काही वर्षांच्या अथक परिश्रमानंतर प्रयोगाची काही तात्पर्य काढतो. या तात्पर्याच्या आधारेच आपण शालेय ज्ञान घेतो, त्यावेळी त्या वैज्ञानिकावर पूर्ण श्रद्धा असल्याखेरीज ते ज्ञान ग्रहण करता येत नाही. प्राचीन ऋषीमुनीसुद्धा वैज्ञानिकच होते. वेदउपनिषदांतील तात्पर्यांमागे त्यांची शेकडो वर्षांची तपश्चर्या होती. उपनिषदांतील तात्पर्यांनुसार ईश्वरीतत्त्वाशी नातं सांगणारा आपल्यातील हा आंतरप्रकाश आणि प्रत्यक्ष ईश्वरीतत्त्व यांच्यातील मनाने मानलेले अंतर हाच आपल्या मनातील अंधार होय. हे दूरत्व जेव्हा नाहीसे होईल, तेव्हा त्याबरोबरच जीवनातला सर्व अंध:कार कायमचा संपलेला असेल.

अंधाराकडून प्रकाशाच्या वाटेवर चालण्याचा निर्धार करणे, हा या दीपोत्सवाचा खरा अर्थ आहे. दिवाळीच्या दिवशी हा ज्ञानाचा दिवा खरोखरी लावता आला पाहिजे. एखादी पणती पेटवण्यासाठी आवश्यक असते, ती वात, तेल आणि अग्नी. या तिन्हींच्या एकत्रीकरणाशिवाय प्रकाशाची निर्मिती होत नाही. परिणामत: अंध:काराचा नाश होत नाही. आपल्या जीवनातील अंध:काराचा नाश होण्याकरिता कर्माची वात, भक्तीचं तेल आणि आत्मजाणिवेची ज्योत लावून ज्ञानाचा प्रकाश निर्माण करण्याचा संकल्प हवा.

- वासुदेव बापट, प्रमुख, ओम सद्गुरू प्रतिष्ठान

(वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर, खोपोली स्थानांवर गुरूपदी आहेत.)